MHRT070003362016

| | | |
|---|---|---|
| प्रकरण दाखल तारीख | : | १६/०३/२०१६ |
| प्रकरण नोंद तारीख | : | १६/०३/२०१६ |
| निकालाची तारीख | : | २७/०३/२०२६ |
| कालावधी | : | वर्षे – महिने – दिवस<br>१० ०० ११ |

**भाग अ**

**चिपळूण येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.२ यांचे न्यायालयात**

( पिठासीन अधिकारी युवराज चंद्रकांत पाटील )

**नियमित फौजदारी खटला नं.२७/२०१६** **निशाणी नं.७८**

**(अलोरे शिरगाव पोलीस स्टेशन गु.र.नं.१६/२०१५)**

**अभियोग पक्ष** :- **महाराष्ट्र सरकार तर्फे**

प्राची दिपक तिवारी, वय-२० वर्षे,

रा.मंदार कॉलेज, पेढांबे ता.चिपळूण, जि.रत्नागिरी.

**प्रतिनिधित्व** :- सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती.एस.आर.वनकर

**-विरुध्द-**

**बचाव पक्ष** :- **सचिन राजाराम पालांडे,** वय-३७ वर्षे,

रा.नागावे, पालांडेवाडी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी.

**प्रतिनिधित्व** :- आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.केळकर

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हा दिनांक | १४/१०/२०१५ ते १८/१०/२०१५ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २०/१०/२०१५ |
| दोषारोप पत्र दाखल दिनांक | १६/०३/२०१६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ११/०२/२०२० |
| न्याय निर्णय राखीव दिनांक | ------- |
| न्याय निर्णय दिनांक | २७/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, दिली असेल तर | ------- |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक/ फौ.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे नोटीस | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप | शिक्षा दिली अथवा मुक्त केले | काय शिक्षा दिली | फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे आरोपीचा कारागृहातील कालावधी वजावट होण्यास पात्र आहे का |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सचिन राजाराम पालांडे | १८/०१/ २०१६ | २०/०१/ २०१६ | भा.दं.वि.सं. कलम २०१, ५०९ व माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६७, ६७(अ) | निर्दोष मुक्त केले | निर्दोष मुक्त केले | --- |

## भाग क

## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी

| क्रमांक | नाव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| १. | मनिष पांडूरंग शिंदे | पंच |
| २. | प्राची दिपक तिवारी | फिर्यादी |
| ३. | भारती भालचंद्र सावरटकर | साक्षीदार |
| ४. | भुषण रामचंद्र शिंदे | साक्षीदार |
| ५. | निवेदीता विनोद सावरटकर | साक्षीदार |
| ६. | मानसी महेश शिंदे | साक्षीदार |
| ७. | संजय एकनाथ महाडिक | पंच |
| ८. | गणेश भिवाजीराव साळुंखे | पंच |
| ९. | हेमंत रामचंद्र देशमुख | साक्षीदार |
| १०. | प्रमोद केशवराव मकेश्वर | तपासीक अमंलदार |

अभियोग पक्षाचा पुरावा नि.७५ कडील दि.१८.११.२०२५ रोजीच्या पुरशीसने बंद करण्यात आला. आरोपीतर्फे कोणताही पुरावा घेण्यात आला नाही.

## अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालय निशाणी यादी

**अ. अभियोग पक्ष**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | २० | दि.२२/१०/२०१५ रोजीचा घटनास्थळ पंचनामा |
| २. | २१ | दि.२२/१०/२०१५ रोजीचा जप्ती पंचनामा |
| ३. | २२ | दि.२६/१०/२०१५ रोजीचा स्क्रीन शॉट व चार सीडी जप्ती पंचनामा |
| ४. | ३८ | दि.२०/१०.२०१५ रोजीची तक्रार |
| ५. | ३९ | सी.डी |
| ६. | ५० | दि.१८/०१/२०१६ रोजीचा पंचनाम्यावरील पंचाची सही |
| ७. | ५१ | दि.१९/०१/२०१६ रोजीचा मेमोरंडम पंचनाम्यावरील सही |
| ८. | ५२ | दि.१९/०१/२०१६ रोजीच्या मेमोरंडम पंचनाम्यावरील सही |
| ९. | ५३ | दि.१९/१०/२०१५ रोजीचा घर झडती निवेदन पंचनाम्यावरील पंच क्र.१ ची सही |
| १०. | ५६ | दि.१९/०१/२०१६ रोजीचा निवेदन पंचनाम्यावरील पंच क्र.१ ची सही |
| ११. | ५७ | दि.१९/०१/२०१६ रोजीच्या निवेदन पंचनाम्यावरील सही |
| १२. | ५८ | दि.१९/०१/२०१६ रोजीचा घरझडती पंचनाम्यावरील सही |
| १३ | ६७ | दि.०७/११/२०२५ रोजीचे पत्र |
| १४. | ६८ | दि.०९/०१/२०१६ रोजीचे पत्र |
| १५. | ६९ | दि.२१/१०/२०१५ रोजीचे पत्र |
| १६. | ७० | मुद्देमाल पावती |
| १७. | ७१ | मेमोरंडम पंचनामा |
| १८. | आर्टिकल अ | मौ.मु.रजि.नं.८/१६ वरील क्र.१ मोबाईल |

| | | |
|---|---|---|
| १९. | आर्टिकल अ | फिर्यादीसोबत दिलेल्या स्क्रीनशॉटच्या झेरॉक्सप्रती |
| २०. | आर्टिकल अ | निता तुकाराम पडवेकर यांच्या आधार कार्डची झेरॉक्स |
| २१. | आर्टिकल बी | मोबाईल |
| २२. | आर्टिकल सी | एल.जी. कंपनीचा मोबाईल |
| २३. | आर्टिकल डी | सीडी |
| २४. | आर्टिकल इ | डी.व्ही.डी. |

## न्यायनिर्णय

( दिनांक २७/०३/२०२६ रोजी जाहीर )

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे,**

दि.१४.१०.२०१५ रोजी दु.१३.१४ ते दि.१८.१०.२०१५ रोजी सायंकाळी १८.०७ वाजण्याच्या सुमारास मंदार कॉलेज, पेढांबे, ता.चिपळूण येथे फिर्यादी हिच्या मोबाईल क्र.९८३३६०७७६५ या व्हॉट्स ॲप वर आरोपी यांनी त्यांच्या मोबाईल क्र.८१४९९२९५७२ वरून अश्लील मेजेस व इमेजेस पाठवून फिर्यादीचे मनास लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले. म्हणून फिर्यादीने गु.र. नं.१६/२०१५ ने प्रथम खबर दाखल केली.

**२)** गुन्ह्याचा तपास पो.नि. पी.के.मकेश्वर यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदवले. तसेच घटनास्थळ, निवेदन, घरझडती व जप्ती पंचनामा तयार केला. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा आढळून आल्याने त्यांचे विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**३)** आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर त्यांना त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपशील समजावून सांगणेत आला व नि.१५ अन्वये दोषारोप

ठेवण्यात आले. आरोपीने नि.१६ कडे गुन्हा कबूल करण्यास नकार दिल्याने त्यांचे विरुध्द खटला चालविण्यात आला.

**४)** अभियोग पक्षाचा पुरावा संपल्यानंतर आरोपीचा फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वयेचा जबाब नि.७६ कडे नोंदविण्यात आला.

**५)** वरील सर्व बाबींचा विचार करता पुढील वादप्रश्न खटल्याच्या निर्णयाकरीता उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे देत आहे.

| **क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दि.१४.१०.२०१५ रोजी दु.१३.१४ ते १८.१०.२०१५ रोजी सायंकाळी १८.०७ वाजण्याच्या सुमारास मंदार कॉलेज, पेढांबे, ता.चिपळूण येथे फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्या मोबाईल क्र.९८३३६०७७६५ या व्हॉट्स ॲप वर आरोपीने त्यांच्या ८१४९९२९५७२ या क्रमांकावरून अश्लील मेजेस व इमेजेस पाठवून फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले व पुरावा नाहीसा करण्याच्या उद्देशाने प्रस्तुतचा गुन्हा केला असे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | **नकारार्थी** |
| **२.** | अंतीम आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त केले.** |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ व २ :**

**६)** अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवादादरम्यान असे कथन केले की, अभियोग पक्षाने एकूण १० साक्षीदार तपासले असून ते अभियोग पक्षास पुरक अशी साक्ष देतात. सदर साक्षीदार घटनेच्या अनुषंगाने शपथेवर कथन करतात. त्यामुळे दि.१४.१०.२०१५ ते दि.१८.१०.२०१५ दरम्यान आरोपीने त्यांच्या मोबाईलवरून फिर्यादीच्या व्हॉट्स ॲपवर अश्लील मेसेज व इमेजेस पाठवून विनयभंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या मनास लज्जा उत्पन्न केली व पुराव नष्ट करण्याच्या हेतूने गुन्ह्यात वापरलेला मोबाईल सिमकार्ड सह तोडून पिंपळी येथील कॅनॉलमध्ये टाकून दिल्याचे शाबीत होते. म्हणून आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा व द्रव्यदंड सुनावण्यात यावा.

**७)** याउलट आरोपी तर्फे विधीज्ञानी युक्तीवादादरम्यान असे कथन केले की, फिर्यादीने तक्रार अनोळखी इसमाविरुध्द दाखल केला असून प्रथम खबरी अहवाल देखील अनोळखी इसमाविरुध्द आहे. ज्या मोबाईल क्रमांकावरुन फिर्यादीस सदर मेसेज व इमेजेस पाठवले ते आरोपीने पाठवले किंवा कसे याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. ते मोबाईल व सिम जप्त केलेले नाही. तसेच फिर्यादीच्या कथनांना सहकार्य करणारा एकही स्वतंत्र साक्षीदार नाही. घटना दि.१४.१०.२०१५ ते दि.१८.१०.२०१५ च्या सुमारास घडली असून तक्रार देण्यास सुमारे २ दिवसाचा विलंब झाला आहे. फिर्यादी व साक्षीदारांनी सदर विलंबाचे कोणतेही कारण नमूद केलेले नाही. तपासादरम्यान ज्या इसम व मित्राची नावे निष्पन्न झाली त्यांच्याकडे तपासी अमंलदाराने चौकशी केलेली नाही. फिर्यादीसोबत मंदार कॉलेज मधील एकही जबाबदार व्यक्ती तक्रार दाखल करण्यासाठी पुढे आलेली नाही. त्यामुळे केवळ आरोपी मोबाईल व सिम कार्ड

विक्रीचे काम करतो या संशयावरून आरोपीविरुध्द प्रस्तुतचा गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी व साक्षीदारांच्या पुराव्यामध्ये आरोपीने सदर मेसेज व इमेजेस पाठवून फिर्यादीचा विनयभंग व मनास लज्जा उत्पन्न करण्याच्या उद्देशाने आणि पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते. प्रस्तुतचा गुन्हा संशयापलिकडे जावून आरोपी विरूद्ध शाबीत होत नाही. म्हणून आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात यावे.

**८)** येणेप्रमाणे युक्तीवाद व अभिलेखावरील तोंडी आणि कागदोपत्री पुरावा पाहता फिर्यादीने दि.२०.१०.२०१५ रोजी लेखी तक्रार नि.३८ दिल्यावरुन गु.र.नं.१६/२०१५ अलोरे शिरगाव पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.सं. कलम २०१, ५०९ व माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६७, ६७(अ) प्रमाणे दाखल झाला. त्या असे नमूद करतात की, त्यांच्या जवळ एल.जी. कंपनीचा मोबाईल व व्होडाफोन कंपनीचे सिमकार्ड होते. त्यांनी अश्लील मेसेज करणाऱ्या इसमाच्या मोबाईलवर फोन केला असता त्याने सॉरी बोलले व त्याने सदर मेसेज पाठवले नसून मित्र गज्नी आणि तुषार यांनी पाठवल्याचे सांगितले. त्यांनी त्या इसमाचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव मंदार कोंडूस्कर असे सांगितले. तसेच दोन दिवसापुर्वी मंदार कॉलेजमध्ये आलो असताना वरील मित्रांनी त्याचा मोबाईल घेवून मेसेज केल्याचे तो सध्या फिनोलेक्स कॉलेज, रत्नागिरी येथे आहे असे सांगितले. म्हणून तिने त्याच्याकडे त्या मित्राबाबत चौकशी केली असता त्याने फोन कट केला. या प्रकाराबाबत तिने रेक्टर यांना सांगितले.

**९)** दि.२०.१०.२०१५ रोजी २२.४७ वा. सुमारास प्रथम खबर अहवाल दाखल करुन घेण्यात आला. त्यातील कथने पाहता फिर्यादी असे नमुद करते की, दि.१४.१०.२०१५ रोजी दुपारी ०१.१४ वाजता त्यांचे मोबाईलच्या व्हॉट्स ॲप

वर एक hey असा मेसेज आला. सदरचा मेसेज हा क्र.८१४९९२९५७२ वरुन आला. त्यानंतर त्यांनी त्यास who's dis असे उत्तर दिले असता सदर मोबाईल वरुन manali असे उत्तर आले. सदर मोबाईल नंबर वर सायंकाळी ०६.१५ मिनिटांपर्यत सहज चॅटिंग केली. त्यानंतर काही वेळाने नेट रिचार्ज संपले असल्याने व्हॉट्स ॲप बंद पडले. त्यानंतर त्यांनी दि.१८.१०.२०१५ रोजी रिचार्ज केले त्यावेळी वरील मोबाईल वरुन त्यांना दि.१५.१०.२०१५ रोजीचे काही मेसज होतो. दि.१६.१०.२०१५ रोजी सुध्दा मोबाईलवर A त्यानंतर hey असा मेसज आला. त्यानंतर ७ न्युडस फोटो पाठविले व मोबाईलवर अश्लिल मेसेज दि.१८.१०.२०१५ रोजी दुपारी रिर्चाज केल्या नंतर पाहिले. त्यांनतर रागाने सदर मोबाईल चॅटिंग करुन त्यास शिवीगाळ केली.

**१०)** त्या पुढे असेही कथन करतात की, त्यानंतर त्यांनी वरील प्रकार मित्र नंदकुमार आचारी यांना फोन करुन सांगीतला. त्यास सदरचा अनोळखी नंबर सांगीतला. त्याने अश्लिल मेसेज पाठविणारे इसमाचे मोबाईलवर फोन केला असता त्याचे नाव गज्नी असे सांगतले. त्यास ''तु असे मेसज व फोटा का टाकतोस" असे विचारले असता त्याने ''मर्जी" असे प्रथम सांगीतले व त्यानंतर त्याच्या मित्राने दारुच्या नशेत मेसेज पाठविले असल्याचे सांगीतले. त्यास "अशा प्रकारचे मेसेज वगैरे काही पाठवु नको" असे सांगीतले असता ''तु काय करणार" असे म्हणुन ''माझी मर्जी झाली व ती मला चांगली वाटली म्हणुन मेसेज केले" असे सांगीतले. त्यावेळी फोन कट झाला. त्यानंतर सदर बाब ही तिच्या मित्राने तिला सांगितली.

**११)** वरील नंबर त्यांनी ब्लॉक केला व सायंकाळी पुन्हा सुरु केला असता त्याने परत अश्लिल मेसेज पाठविणे सुरु केले. त्यांनी त्यास "मंदारच्च्या गेट वर ये" वगैरे मेसज केले. परंतु, तो काही आलेला नाही. सदर मेसेज हे त्यांना ०६.०७ वाजे

पर्यंत आले. त्यानंतर काही चॅटिंग केलेली नाही. वरील सर्व प्रकार हा त्यांनी त्यांचे वडीलाच्या मोबाईलवर फोन करुन सांगीतला असता त्यांनी सदर मोबाईलवर फोन करण्याचा प्रयत्न केला. सदरचा मोबाईल हा स्विच ऑफ केलेला होता. त्यानंतर वरील प्रकार हा त्यांनी त्यांचे प्रिन्सीपॉल व त्यांची मैत्रिण प्रिती जाधव यांना सांगीतला. तसेच त्यांचे वडीलानी वरील प्रकार हा त्यांचे मित्र सुधाकर शिंदे पोलीस पाटील पेढांबे यांना देखील सांगीतला होता.

**१२)** दि.१९.१०.२०१५ रोजी कॉलेज मधुन भुषण शिंदे, सर यांनी तिला अश्लिल मेसेज करणारे इसमाचे मोबाईलवर आपले मोबाईल वरुन फोन करत होते त्यावेळी तिच्या वडीलाचे मित्र सुधाकर शिंदे हे देखील सदर ठिकाणी हजर होते. परंतु त्या इसमाने मोबाईल उचलला नाही. म्हणुन शिंदे सरांनी तिच्या मोबाईल वरुन फोन करण्यास सांगितला असता तिने त्यास फोन केला तेव्हा त्यांने सॉरी बोलले व त्यास तिने "असे मेसेज व फोटो का पाठविलेस" असे विचारले असता त्याने सदर "मेसेज मी पाठविले नसुन माझे मित्र गज्री आणि तुषार" यांने पाठविले असल्याचे सांगीतले. त्यानंतर तिने त्याचे नाव विचारले असता "मंदार कोडूस्कर" असे सांगितले. तो सध्या "फिनोलेक्स कॉलेज रत्नागिरी" येथे आहे असे सांगितले.

**१३)** त्यामुळे प्रस्तुतचा गुन्हा शाबीत होण्यासाठी माहीती तंत्रज्ञान कायदा, २००० मधील कलम ६७ प्रमाणे जो कोणी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रकाशित किंवा प्रसारित करतो किंवा प्रकाशित किंवा प्रसारित करण्यास लावतो, अशी कोणतीही सामग्री जी कामुक आहे किंवा हितसंबंधांना आवाहन करते किंवा जर त्याचा परिणाम अशा व्यक्तीना भ्रष्ट करण्याचा आहे, ज्यांना सर्व संबंधित परिस्थिती लक्षात घेऊन, त्यात समाविष्ट असलेली किंवा अंतर्भूत असलेली गोष्ट वाचण्याची, पाहण्याची किंवा ऐकण्याची शक्यता आहे, तर त्याला पहिल्या दोषसिद्धीवर तीन वर्षांपर्यंतच्या

कारावासाची आणि पाच लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची आणि दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या दोषसिद्धीच्या बाबतीत पाच वर्षांपर्यंतच्या कारावासाची आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा होईल. कलम ६७अ प्रमाणे जो कोणी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात लैंगिकदृष्ट्या स्पष्ट कृत्य किंवा वर्तन असलेली कोणतीही सामग्री प्रकाशित करतो किंवा प्रसारित करतो किंवा प्रकाशित किंवा प्रसारित करण्यास लावतो त्याला पहिल्या दोषसिद्धीवर पाच वर्षांपर्यंतच्या कारावासाची आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा होईल आणि दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या दोषसिद्धीवर सात वर्षांपर्यंतच्या कारावासाची आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा होईल.

**१४)** आरोपीतर्फे विधज्ञानी केलेल्या युक्तीवादाप्रमाणे लेखी तक्रार नि.३८ व प्रथम खबर अहवाल पाहता फिर्यादी व मंदार कॉलेज येथील शिक्षक भुषण शिंदे, फिर्यादीचे वडील व त्यांचे मित्र सुधाकर शिंदे यांनी जी काही चौकशी केली त्यामध्ये मंदार कोंडूस्कर फिनोलेक्स कॉलेज, रत्नागिरी यांचे नाव निष्पन्न झाले व त्याचे मित्र गज्ञी आणि तुषार यांनी सदर मेसेज पाठवले असल्याचे समजले. त्यामुळे तपासी अमंदाराने याकामी काय तपास केला व तपास आणि पुराव्या अंती काय निष्पन्न झाले ते पाहणे उचित ठरते. म्हणून सर्वप्रथम साक्षीदार क्र.२ फिर्यादी प्राची दिपक तिवारी यांचा नि.३७ कडील सरतपास पाहता त्या तक्रार नि.३८ व प्रथम खबर अहवाल अनुषंगाने कथन करतात. त्यांना जे काही न्युड फोटो व अश्लील मेसेज आले ते आर्टिकल अ म्हणून अभिलेखावर दाखल आहेत.

**१५)** फिर्यादीने घटनेचा प्रथम उल्लेख मित्र नंदकुमार आचारी यांचे समोर केला. त्यांनी देखील त्या अनोळखी क्रमांकावर फोन करून तु कोण आहेस असे विचारले असता समोरचा गज्ञी आहे असे सांगितला. त्यानंतर फिर्यादीने घटनेचा

उल्लेख तिच्या वडीलाना केला, प्रिन्सीपॉल व रुममेट प्रिती जाधव यांना सांगितला. तसेच वडीलाचे मित्र पोलीस पाटील सुधाकर शिंदे यांना देखील सांगितला. वर नमुद केल्याप्रमाणे भुषण शिंदे सर यांनी देखील त्यांच्या क्रमांकावरून कॉल करण्याचा प्रयत्न केला व फिर्यादीच्या क्रमांकावरून कॉल केला असता तो मंदार कोडूस्कर यांनी उचलला व मेसेजेस त्याचे मित्र तुषार आणि गज्ञी यांनी त्यांच्या क्रमांकावरून पाठवल्याचे सांगितले. पोलीसांनी फिर्यादीचा मोबाईल फोन जप्त केला. कॉलेजमधील तंत्रज्ञाकडून फोनवरील स्क्रीनशॉटची सीडी नि.३९ बनवून घेतली. या सरतपसामध्ये देखील फिर्यादी सदर मेसेजेस व इमेजेस आरोपीने पाठवले किंवा कसे याबाबत कोठेही कथन करत नाहीत.

**१६)** साक्षीदार क्र.४ भुषण रामचंद्र शिंदे यांचा नि.४३ कडील सरतपास पाहता त्यांनी त्या क्रमांकावर फोन करून कोण बोलते असे विचारले असता मंदार कोंडूस्कर व मेसेजेस तुषार आणि गज्ञी यांनी केल्याचे सांगितले असे कथन करतात. याही साक्षीदाराने सरतपासामध्ये आरोपीविरूध्द कोणतेही कथन केलेले नाही. साक्षीदार क्र.६ मानसी महेश शिंदे हया मंदार कॉलेज महिला वस्तीगृहातील रेक्टर असून नि.४८ कडे प्राचार्यांनी फिर्यादीच्या मोबाईलवरून त्या क्रमांकावर फोन केला असता त्याने त्याचे नाव मंदार कोंडूस्कर व मेसेज आणि इमेजेस त्याचा मित्र गज्ञु व तुषार यांनी पाठविले असल्याचे कथन करतात. म्हणजेच सदर साक्षीदार देखील सरतपसामध्ये आरोपीविरूध्द कथन करत नाहीत.

**१७)** त्यामुळे या कामामध्ये प्रस्तुत आरोपी याचे नाव कसे समोर आले हे पाहण्यासाठी साक्षीदार क्र.३ भारती भालचंद्र सावरटकर यांची नि.४२ कडील साक्ष पाहता त्यांच्या सुनेचे माहेरचे नाव निता तुकाराम पडवेकर असून सासरचे नाव निवेदीता सावरटकर आहे. त्यांच्या घरी फोन नसल्याने त्यांनी सुनेला आधार कार्ड

व फोटो असतील तर सचिन पालांडे (आरोपी) हे मोबाईल शॉपीवाले आहेत त्यांच्याकडे जावून एखादा जूना फोन मिळतो का ते पाहते असे सांगितले. त्यांनी सुनेचा आधार कार्ड व फोटो अलोरे येथील सचिन पालांडे यांच्या मोबाईल शॉपीमध्ये नेले व ५०० ते ७०० रुपये पर्यंतचा जुना मोबाईल असेलतर द्या अशी मागणी केली. तेव्हा सचिन पालांडे यांनी कागदपत्रे आधार कार्डची झेरॉक्स व फोटो लागतील असे सांगितले. तेव्हा सदर साक्षीदाराने तिचे आधार कार्ड हरवले असल्याने सुनेच्या आधार कार्डची झेरॉक्स व फोटो दिला. तेव्हा सचिन पालांडे यांनी एखादा जुना मोबाईल मिळतो का बघतो, नाही मिळाला तर १५००/- रुपये पर्यंतचा नवा मोबाईल घ्यावा लागेल असे सांगितले.

**१८)** सदर साक्षीदार पुढे असेही कथन करतात की, त्या आठ दिवसांनी सिमकार्ड काढले का व जुना मोबाईल भेटला का ते पाहण्यासाठी गेल्या असता सचिन पालांडे यांनी त्यांना सांगितले की, भेटला नाही आणखी पाहतो व भेटला तर तुम्हाला फोन करतो. आठ ते दहा दिवसांनी त्यांचा मुलगा पुण्याहून आल्याने त्यांना फोनची गरज वाटली नाही. म्हणून त्या सचिन पालांडे यांच्याकडे परत गेल्या नाहीत. तेव्हा सात ते आठ महिन्यांनी पोलीस स्टेशनहून सरपंचांना फोन आला व निता तुकाराम पडवेकर या नावाने सिमकार्ड घेतले आहे का अशी चौकशी केल्याचे सांगतात. त्यामुळे याही साक्षीदाराचा सरतपास पाहता आरोपीने या साक्षीदाराच्या सुनच्या आधारकार्डच्या झेरॉक्स व फोटोचा गैरवापर करून मोबाईल क्र.८१४९९२९५७२ हा मंदार कोंडूस्कर किंवा त्याचे मित्र तुषार किंवा गज्री यांना दिले किंवा कसे याबाबत कोठेही कथन करत नाहीत.

**१९)** साक्षीदार क्र.५ निवेदीता विनोद सावरटकर नि.४५ कडे वरील साक्षीदाराच्या कथनांच्या अनुषंगाने कथन करतात. परंतु, याही साक्षीदाराच्या

सरतपास व उलटतपासामध्ये आरोपीने तिच्या आधार कार्डच्या झेरॉक्स व फोटोचा गैरवापर केला किंवा कसे याबाबत कोठेही कथन आलेले नाही. याउलट आरोपीचे दुकान त्यांच्या घरपासून तीन ते चार कि.मी. अंतरावर आहे. तसेच त्यांची सासू साक्षीदार क्र.३ भारती भालचंद्र सावरटकर ह्या आरोपीकडे कामाला होत्या असे कथन करतात. त्यामुळे आरोपीने तिच्या आधारकार्ड व फोटोचा गैरवापर केला किंवा कसे याबाबत पुरावा अभिलेखावर आलेला नाही. मग ८१४९९२९५७२ हा क्रमांक मंदार कोंडूस्कर किंवा त्याचे मित्र गज्जु व तुषार यांच्या कडे गेला कसे हा प्रश्न निर्माण होतो. सिमकार्ड दि.०९/०५/२०१५ रोजी ॲक्टीवेट करण्यात आले असून घटना दि.१४.१०.२०१५ ते १८.१०.२०१५ रोजीची असल्यामुळे रिटेलर साईराज मोबाईल नितीन शिगवण, डिस्ट्रीब्युटर प्रविण कम्युनिकेशन प्रविण रघुनाथ साळवी व सिम ॲक्टीवेशन करणारे सरफराज सुर्वे यांच्या कडे तपासी अंमलदारने चौकशी केलेली दिसून येत नाही.

**२०)** उपरोक्त साक्षीदाराप्रमाणे साक्षीदार क्र.९ हेमंत रामचंद्र देशमुख नि.५९ कडे ते आरोपीला ओळखतात, आरोपी त्यांचा नातेवाईक आहे, तो २०१६ साली मोबाईल सिमची विक्री अलोरे येथे करत होता असे कथन करतात. ते सिमकार्ड आरोपीच्या दुकानातून घेत होते व ते घेताना आधार व पॅनकार्ड आरोपीला देत होते. पोलीसांनी त्यांना पोलीस स्टेशनला बोलावून "तुमच्या सिमचा गैरवापर केलेला आहे" असे सांगितले. त्यांनी त्यांची कोणतीही कागदपत्रे दिलेली नव्हती. त्यामुळे ते सिम कसे गेले हे त्यांना माहीत नाही. म्हणून उलटतपासादरम्यान पोलीसांनी त्यांच्याकडून कोणतेही कागदपत्र अथवा सिम जप्त केलेले नाही, सिमकार्ड कोणाच्या नावावर होते, कोणाचे होते याची कल्पना नाही आणि त्या सिमकार्डशी त्यांचा काहीही संबंध नाही असे कथन करतात.

**२१)** दि.१८.०१.२०१६ रोजीचे सिमकार्ड क्र.८१४९२८३९९५ सिमकार्ड आरोपीच्या नावे असून एस.डी.आर प्राप्त झाल्याने सिमकार्ड आरोपीने सदर पंचासमक्ष हजर केले आरोपीने फिर्यादीस मोबाईल क्र.८१४९९२९५७२ या सिम कार्डवरून मेसेज व इमेजेस एक मोबाईल आयएमआयई क्र.३५५४८९०५७६३२६१० मध्ये वापरले व त्या मोबाईलचा शोध घेतला असता तो आरोपीने रिचार्ज करण्यासाठी वापरल्याचे सांगितले असा मजकूर पंचनाम्यात नमुद आहे. परंतु, साक्षीदार क्र.७ संजय एकनाथ माळी नि.४९ कडे पोलीसांनी त्यांना दि.१८.०१.२०१६ रोजी तुमची साक्ष हवी आहे व त्यावर सह्या करा असे म्हटल्यामुळे सही केली व दि.१९.०१.२०१६ रोजी देखील पोलीसांनी एक कागद दिला व परवा सह्या दिल्यात त्याप्रमाणे आजही सह्या द्या असे म्हटल्यामुळे सही केली असे कथन करतात.

**२२)** साक्षीदार क्र.८ गणेश भिवाजीराव साळुंखे दि.१९.०१.२०१६ रोजीचे निवेदन/मेमोरंडम आणि घर झडती पंच असून नि.५५ कडे त्यांना दि.१९.०१.२०१६ रोजी काय कार्यवाही झाली याची कल्पना नाही, ते त्यांच्या क्लासमध्ये होते. तेव्हा पोलीसांनी त्यांना मेडीकलजवळ येण्याचा निरोप पाठवला, पोलीसांनी त्यांना पंचनामा आहे त्यावर साक्षीदार म्हणून सही करा असे म्हटल्यामुळे त्यांनी सही केल्याचे कथन करतात. त्यामुळे अभिलेखावरील एकंदरीत साक्षीदार क्र.२ ते ८ यांचा सरतपास व तक्रार आणि तपास टिपण पाहता आरोपीने फिर्यादीस वरील प्रमाणे मेसेजेस व इमेजेस पाठवले किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते.

**२३)** उपरोक्त साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने दि.२९.०१.२०१६ रोजीचे निवेदन पाहता आरोपी वापरत असलेला सॅमसंग कंपनीचा मोबाईल सिमकार्ड सह तोडून पिंपळी येथील कॅनॉलमध्ये टाकून दिल्याचे

नमुद आहे. परंतु ते शाबीत करण्यासाठी एकही पुरावा नाही. केवळ नि.७१ मेमोरंडम पंचनामा करण्यात आला. दि.१९.१०.२०१५ रोजी घरझडती पंचनामा करण्यात आला. त्यामधील संशयीत चिजवस्तु व गुन्हयात वापरलेला मोबाईल मिळून आला नाही. म्हणून दि.१८.०१.२०१६ रोजीचा आरोपी रिचार्ज करण्यासाठी जो मोबाईल वापरत होते तो नोकीया मॉडेल क्र.१०१, व्होडाफोन कंपनीचे सिमकार्ड, नोकीया कंपनीचा मॉडेल क्र.१२८० व डोकोमो कंपनीचे सिमकार्ड इ. जप्ती पंचनामा करण्यात आला. त्यावरून त्या मोबाईल मध्ये आरोपी सदर सिम कार्ड क्र.८१४९९२९५७२ वापर होते किंवा कसे याही बाबत पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

**२४)** साक्षीदार क्र.१ मनिष पांडूरंग शिंदे दि.२२.१०.२०१५ रोजीचे घटनास्थळ पंच असून नि.१९ कडे कथन करतात की, घटनास्थळ कॉलेजचे ग्राउंड व हॉस्टेल होते. पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा नि.२० तयार केला व दुसरा पंचनामा मंदार कॉलेजच्या कार्यालयात करण्यात आला. तेथे फिर्यादीच्या मोबाईलचा पंचनामा करण्यात आला. तो एलजी कंपनीचा असून पोलीसांनी त्यांच्या समक्ष फिर्यादीच्या मोबाईलवरील मेसेजेस पाहीले व मोबाईल तंत्रज्ञ शिंदे यांच्या ताब्यात दिला. त्यानंतर पोलीसांनी तो जप्त केला. त्याचा पंचनामा नि.२१ करण्यात आला. एकंदरीत अभिलेखावरील उपलब्ध पुरावा पाहता तक्रार, प्रथम खबर अहवाल व फिर्यादीच्या पुराव्यामध्ये मंदार कोंडूस्कर, त्याचे दोन मित्र तुषार व गज्ञी यांचे नाव निष्पन्न झाले. साक्षीदार क्र.३ व ५ यांच्या पुराव्यामध्ये आरोपी हे मोबाईल व सिम विक्रीचा व्यवसाय करत असल्यामुळे त्यांचे नाव निष्पन्न झाले.

**२५)** परंतु, तपासी अमंलदाराने फिनोलेक्स कॉलेजमधील मंदार कोंडूस्कर, त्याचे दोन मित्र तुषार व गज्ञी यांच्याकडे चौकशी केली किंवा कसे याबाबत प्रश्नचिन्ह

निर्माण होते. म्हणून साक्षीदार क्र.१० प्रमोद केशवराव मकेश्वर तपासी अमंलदार यांचा नि.६४ कडील सरतपास पाहता त्यांनी फिर्यादीकडून मोबाईल जप्ती केली, जप्ती व घटनास्थळ पंचनामा तयार केला, ज्या मोबाईलवरून फिर्यादीला अश्लील मेसेज व इमेजेस पाठवले होते त्याचा एस.डी.आर. व सी.डी.आर मागवण्यासाठी पोलीस अधिक्षक यांच्याकडे पत्र नि.६७, ६८, ६९ देण्यात आले, मुद्देमाल पावती नि.७० तयार केली, साक्षीदारांचे तपास टिपण नोंदवले. मोबाईल स्क्रीनशॉट प्राप्त करून सिडी नि.३९ तयार केली रासायनिक तपासणी अहवाल मागविला असे कथन करतात.

**२६)** तपासी अमंलदार उलटतपसादरम्यान मान्य करतात की, भुषण शिंदे हे तांत्रीक आहेत किंवा कसे याबाबत त्यांच्याकडून कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र घेतले नव्हते, दि.२२.१०.२०१५ रोजी जप्त केलेला मोबाईल दि.२६.१०.२०१५ रोजी संगणकाला जोडला, तो माबाईल संगणकाला जोडल्यानंतर पुन्हा जप्त करताना त्याचा पंचनामा केला किंवा कसे ते त्यांना आठवत नाही, वस्तीगृहातून सुरक्षा रक्षकाकडे असणारे रजिस्टर अथवा त्यावरील नोंदी जप्त केल्या नाहीत तसेच वस्तीगृहातील हजेरी पत्रक किंवा वस्तीगृहात दाखल अथवा बाहेर पडताना जे रजिस्टर असते ते जप्त केले किंवा कसे ते त्यांना आठवत नाही. त्यामुळे तपासी अमंलदाराचा संपूर्ण सरतपास व उलटतपास पाहता त्यांनी फिनोलेक्स कॉलेजमधील मंदार कोंडूस्कर व त्याचे दोन मित्र तुषार व गज्ञी यांच्याकडे चौकशी केल्याचे कोठेही नमूद केलेले दिसून येत नाही.

**२७)** म्हणून फिर्यादी, साक्षीदार क्र.४ व क्र.६ यांचा सरतपास पाहता त्यांनी फिर्यादीला ज्या मोबाईलक्रमांकावरून अश्लील मेसेज व न्यूड इमेजेस आले होते त्या नंबरवर कॉल करून विचारले असता त्याने त्याचे नाव मंदार कोंडूस्कर असे कसे

सांगितले याबाबत तपासी अमंलदाराने कोणतीही चौकशी केलेली नाही. त्यामुळे आरोपी सदर मोबाईल क्र.८१४९९२९५७२ हा रिचार्ज मारण्यासाठी जरी वापरत असेल तरी त्यावरून ते मेसेज व छायाचित्रे पाठवण्यात आले किंवा कसे याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. एस.डी.आर. व सी.डी.आर दोषारोपत्रातील पान क्र.२९/१ ते २९/७ व पान क्र.३०/१ ते ३०/७ आणि पान क्र.३१/१ ते ३१/१० दाखल केले असले तरी ते अभियोग पक्षाने शाबीत करण्याचा प्रयत्न केलेला नाही. त्यामुळे फिर्यादीस अश्लील मेसेज व छायाचित्रे पाठवणारी व्यक्ती मंदार कोंडूस्कर होती की त्याचे दोन मित्र तुषार व गज्ञी होते की आरोपी स्वत: होते याबाबत संशय निर्माण होतो. तसेच नोकीया कंपनीचा मॉडेल क्र.१२८० मध्ये सिम कार्ड क्र.८१४९२८३९९५ असे दि.१८.०१.२०१६ रोजीच्या पंचनाम्याने जप्त करण्यात आले तर सिमकार्ड क्र.८१४९९२९५७२ आरोपी सॅमसंग कंपनीच्या मोबाईलमध्ये वापरून त्यावरून फिर्यादीस मेसेज व इमेजेस पाठवत होते किंवा कसे याही बाबतचा पुरावा अभियोग पक्षाने शाबीत केला नाही.

**२८)** साक्षीदार क्र.१ मनिष पांडूरंग शिंदे यांच्या नि.१९ कडील उलटतपासादरम्यान ते मंदार कॉलेजचे सुरक्षा अधिकारी असले तरी पोलीसांनी त्यांना पंचनाम्यासाठी लेखी पत्र दिले नव्हते, दि.२२.१०.२०१५ रोजी लेडीज हॉस्टेलमध्ये त्यांच्यासोबत महिला उपस्थित होत्या, त्या महिलांनी पंचनाम्यावर सह्या केल्या नाहीत, मोबाईल जप्त केल्यानंतर तो सिल उघडून त्या मोबाईल वरून स्क्रीनशॉट घेण्यात आले, तेव्हा त्याचा पंचनामा केला नाही, त्यानंतर पोलीसांनी स्क्रीनशॉट घेतलेल्याचे कथन करतात. साक्षीदार क्र.२ फिर्यादी प्राची दिपक तिवारी नि.३७ कडील उलटतपासादरम्यान तक्रार देण्यास विलंब का झाला त्याबाबतचे कोणतेही कारण नमुद करत नाही. पोलीसांनी स्क्रीनशॉट जप्त करताना त्याचा

पंचनामा केला नाही. तिची, भुषण व मानसी शिंदे यांच्यात घटनेबाबत चर्चा झाली, तिने, पोलीस पाटील, मैत्रिण, भुषण व मानसी शिंदे यांच्याशी चर्चा केल्यानंतर तक्रार द्यावी लागेल असे ठरले, आरोपी तिच्या माहीतीचा व ओळखीचा नव्हता, त्याचे नावही माहीत नव्हते व आरोपीची ओळख परेड देखील झाली नाही असे मान्य करतात. त्यामुळे माहीती तंत्रज्ञान कायदा, २००० मधील कलम ६७ प्रमाणे आरोपीने फिर्यादीस अश्लील मेसेज व न्युड इमेजेस पाठवून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले किंवा कसे हे अभियोग पक्ष शाबीत करू शकले नाही.

**२९)** साक्षीदार क्र.४ भुषण रामचंद्र शिंदे नि.४३ कडे व साक्षीदार क्र.६ मानसी महेश शिंदे नि.४८ कडे आरोपी विरूध्द दोषसिध्दी होण्याइतपत जबाब देत नाहीत. तसेच साक्षीदार क्र.३ भारती भालचंद्र सावरटकर नि.४२ व क्र.५ निवेदीता विनोद सावरटकर नि.४५ कडील उलटतपास पाहता आरोपीने त्यांच्या आधारकार्ड व फोटोचा गैरवापर करून त्या सिमकार्डचा गैरवापर केला अशीही तक्रार असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे असा संशय निर्माण होतो की, दि.१४.१०.२०१५ ते दि.१८.१०.२०१५ रोजी आरोपीने फिर्यादीच्या व्हॉट्स ॲप वर अश्लील मेसेज व इमेजेस पाठवून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले किंवा कसे, पुरावा नाहीसा करण्याच्या उद्देशाने मोबाईल सिमकार्ड क्र.८१४९९२९५७२ तोडून पिंपळी येथील कॅनॉलमध्ये टाकून दिला किंवा कसे व फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने प्रस्तुतचा गुन्हा केला किंवा कसे. सदर संशय अभियोग पक्षाने खोडून काढलेला नाही. त्यामुळे संशयाचा फायदा मिळण्यास आरोपी पात्र आहे. सबब वादप्रश्न क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोदंवून वादप्रश्न क्र.२ चे निष्कर्षादाखल खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

**(१)** आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) प्रमाणे, भारतीय दंड विधान संहिता १८६० चे कलम कलम २०१, ५०९ व माहीती तंत्रज्ञान कायदा २००० चे कलम ६७, ६७(अ) अन्वयेच्या गुन्हयांमधून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

**(२)** आरोपीचा जामीन कदबा व वैयक्तिक जात मुचलका रद्दबातल करणेत येतो.

**(३)** फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७/अ प्रमाणे आरोपीने र.रू.५०,०००/- मात्रचा जामीन कदबा अथवा वैयक्तिक जात मुचलका द्यावा.

**(४)** गु.र.नं.१६/२०१५, अलोरे शिरगाव पोलीस स्टेशन मधील मौ.मु.र.क्र.८/२०१६ एलजी कंपनीचा एक्स १४७ सिम कार्ड क्र.९८३३६०७७६७ फिर्यादी प्राची दिपक तिवारी रा. मंदार कॉलेज पेढांबे यांना अपिल कालावधीनंतर परत दयावा.

**(५)** गु.र.नं.१६/२०१५, अलोरे शिरगाव पोलीस स्टेशन मधील मौ.मु.र.क्र.८/२०१६ नोकीया मॉडेल क्र.१०१ सिम क्र.९९२२७२६९३५ व ७०६६७३५६७५ सह नोकीया मॉडेल क्र.१२८० मोबाईल सिम क्र.८१४९२८३९९५ आरोपीस अपिल कालावधीनंतर परत दयावा.

**(६)** गु.र.नं.१६/२०१५, अलोरे शिरगाव पोलीस स्टेशन मधील मौ.मु.र.क्र.८/२०१६ जप्त स्क्रीनशॉटची सीडी अपिल कालावधीनंतर नाश करावी.

**(७)** सदर न्यायनिर्णयाचा सारांश फिर्यादी प्राची दिपक तिवारी रा.मंदार कॉलेज, पेढांबे, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी यांना समजण्यासाठी एक निशुल्क प्रत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेमार्फत पाठविणेत यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला)

Digitally signed by YUVRAJ CHANDRAKANT PATIL
Date: 2026.03.30 18:19:28 +0530

चिपळूण.
दिनांकः- २७/०३/२०२६

(युवराज चंद्रकांत पाटील)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, चिपळूण.

## - प्रमाणपत्र -

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | २७.०३.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २७.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | ३०.०३.२०२६ |